Fo

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली
   **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0189
   **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/03/2023 13:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 31/01/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/02/2023
      **Time From (वेळेपासून):** 13:25 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 12:30 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 21/03/2023
      **Time (वेळ):** 12:49 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 021
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/03/2023 12:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पश्चिम
      **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** विश्रामबाग पोलीस ठाणे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेश शिवानंद काद्रोळी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | इनाम धामणी, ता मिरज, ,जि सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | इनाम धामणी, ता मिरज, ,जि सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अकबर खताळसो हवालदार | | | 1. रुम नं1 02, वर्धमान इमरड, अपार्टमेंट,अल्फान्सो स्कुल , जवळ, एमआयडीसी रोड,, मिरज,जि सांगली,विश्राम बाग, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि. 21.03.2023
मी सुरेश शिवानंद काद्रोळी, वय 31 वर्ष व्यवसाय:- लॉन्ड्री व रॉयल बेकरी येथे कामगार, रा. इनाम धामणी, ता. मिरज, जि. सांगली. मो.नं.7020469685.
मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस आहे. माझा लहान भाऊ चंद्रकांत, त्याचा मित्र दिपक पाटील व त्यांचा आणखी एक मित्र यांचे विरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाणे जि. सांगली येथे सप्टेंबर 2022 मध्ये मारामारीचा गुन्हा दाखल झाला आहे.
दि.17.01.2023 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथील पोलीस निरीक्षक श्री विनायक भिलारे साहेबं यांची कार्यालयात भेट घेऊन त्यांना विश्रामबाग पोलीस ठाणे येथील पोलीस उप निरीक्षक अकबर हवालदार यांनी माझा लहान भाऊ चंद्रकांत काद्रोळी याला पोलीस स्टेशनला घेऊन ये, नाही तर तुझ्या आई वडीलांना अटक करतो असे सांगीतले. तसेच लहान भाऊ चंद्रकांत याला अटक करायची नसेल व गुन्हयाच्या तपासामध्ये मदत करायची असेल तर प्रत्येक आरोपी करीता 20,000/- रूपये प्रमाणे तीन आरोपींचे एकुण 60,000/- रूपये द्यावे लागतील नाहीतर भावाला मारामारीच्या गुन्हांमध्ये अटक करावी लागेल असे सांगुन अकबर हवालदार यांनी माझ्याकडे 60,000/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतची हस्तलिखीत सविस्तर तक्रार भिलारे साहेबांना दिली.
त्यानंतर भिलारे साहेबांनी दोन पंच अँन्टी करप्शन कार्यालयात बोलावुन घेऊन मला सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करुन दिली. भिलारे साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक भिलारे व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.
त्यानंतर अकबर हवालदार, पीएसआय विश्रामबाग पोलीस ठाणे यांचे विरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पंचा समक्ष दि. 17.01.2023, दि. 20.01.2023, दि. 22.01.2023, दि. 24.01.2023, दि. 31.01.2023, दि.01.02.2023 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये अकबर हवालदार साहेबांनी माझ्याशी व माझा लहान भाऊ चंद्रकांत काद्रोळी याच्याशी गुन्हांसंदर्भात चर्चा करुन लहान भाऊ चंद्रकांत याचेकडून दुसरा आरोपी दिपक पाटील याचा मोबाईल नंबर घेऊन त्याच्याशी गुन्हां संदर्भात चर्चा करुन दि.31.01.2023 रोजीचे पडताळणी कारवाईमध्ये "मी तुम्हाला अटक करणार तुमच्याकडंन चाळीस पन्नास हजार रुपये खाणार" बगं असे सांगुन चाळीस पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. भिलारे साहेबांनी मला व पंच धुमाळ यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण वरील प्रमाणे सभाषण झाल्याची खात्री केली.
त्यानंतर दि.01.02.2023 रोजी पीएसआय हवालदार व पीएसआय हवालदार यांनी उल्लेख केलेले साहेब यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये हवालदार साहेबांनी लहान भाऊ चंद्रकांत यांची पुजारी साहेबांना हे रॉयल बेकरी मारामारी प्रकरणातील आरोपी आहेत अशी ओळख सांगीतली. पुजारी साहेबांनी गुन्हांसंदर्भात चर्चा केली, व ते निघुन गेले. त्यानंतर मी हवालदार साहेबांना प्रकरण आजचे आज संपवणे बाबत विनंती केली. असता हवालदार साहेबांनी आत्ता बी हुतय तु काय करायलाच तयार नाहीस मी काय करु असे सांगीतले. त्यावर मी हवालदार साहेबांना किती पर्यंत करु असे विचारले असता त्यांनी प्रत्येक आरोपी करीता वीस वीस हजारानं जरी धरलास तर साठ हजार रुपये होतयं असे सांगुन माझ्याकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी केली. मी हवालदार साहेबांना कमी करण्या बाबत विनंती केली असता त्यांनी कमी करण्यास नकार देऊन "जेवढं सांगीतलय तेवढंच कर कमी जास्त करशील तर तुझा भावाला त्रास होईल, जोखमदारी कोण घेत नाही फरारी आहेत, दहा माझ्या तोंडान कमी केले आहेत." असे सांगुन माझ्याकडे 50,000/- रुपयांची मागणी केली व त्यानंतर चर्चेअंती 40,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच घेऊन येण्यास सांगीतले असल्याचे निष्पन्न झाले. भिलारे साहेबांनी मला व पंच धुमाळ यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण वरील प्रमाणे



Scanned with OKEN Scanner

संभाषण झाल्याची खात्री केली.
दि.01.02.2023 रोजी पीएसआय अकबर हवालदार, विश्रामबाग पोलीस ठाणे यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन सर्व सापळा पुर्व कारवाई करुन मी हजर केलेल्या 40,000/- रुपये नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेतल्यानंतर नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा पँटचे समोरील उजवे बाजुस असले खिशामध्ये ठेवल्या, त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने भिलारे साहेबांनी योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिला तो मी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुच्या खिश्यामध्ये ठेवला. सापळा कारवाई दरम्यान पीएसआय हवालदार यांनी "जलील भाई को फोन करणार हाय, तु जे करणार हायस ते जलील भाई करलं अस डायरेक्ट मी करुन घेणार नाही तुझाकडनं तुला माहिती आहे." असे सांगुन त्यांनी माझा लहान भाऊ चंद्रकांत काद्रोळी व त्याचा मित्र दिपक पाटील याच्याशी गुन्हाबाबत व कागदपत्रा बाबत चर्चाकरुन त्यांची माहिती फॉर्मवर भरुन घेऊन मला विश्रामबाग पोलीस ठाणे येथून त्यांचे मोटर सायकलवरुन रॅायल बेकरी येथे घेऊन येऊन जलील भाई यांची भेट घेऊन जलील भाईकडे देवुन टाक, त्यांच्याकडनं सोमवारी घेतो असे मला सांगुन ते निघुन गेले. त्यानंतर भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझ्याकडून काढून घेऊन बंद केला. मला जलील भाईकडे पैसे देण्याचे नसल्याबाबत मी भिलारे साहेबांना सांगीतले. त्यावेळी भिलारे साहेबांनी जलील भाई याला विश्वासात घेऊन, जलील भाई याला सापळा कारवाई बाबत सुचना देवुन सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चित करणेकरीता जलील भाई यांचे मोबाईलवरुन पीएसआय हवालदार यांना फोन केला असता हवालदार साहेबांनी पैसे घेण्यास नकार दिल्यानंतर जलील यांने फोन कट केला. त्यावेळी जलील याला अस्वस्थ वाटु लागल्याने त्याला मी हॉस्पीटल मध्ये घेऊन गेलो.
त्यानंतर दि.03.02.2023 रोजी माझा मोठा भाऊ गणेश यांची पीएसआय हवालदार यांनी भेट घेऊन त्याला मोबाईल क्रमांक 9860680196 हा देवुन त्याचेवर संपर्क करुन पैसे देण्यास सांगीतले असता पोलीस निरीक्षक भिलारे साहेबांना सांगीतले. त्याप्रमाणे दोन पंचांचे समक्ष सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चित करणेकरीता मोबाईल क्रमांक 9860680196 वर माझा मोठा भाऊ गणेश यांने संपर्क केला असता सदर मोबाईल नंबर बंद असल्याने, माझा मोठा भाऊ गणेश यांने पीएसआय हवालदार यांना कॉल करुन "साहेब मगाशी नंबर दिला होता, त्या पोरान फोन उचलला नाही" असे सांगीतले. पीएसआय हवालदार यांनी राहु दे, राहु दे असे म्हणुन "मला एवढं सांग ते पोरगं कवा आणणार आहे तिसरं" असे सांगीतले. हवालदार साहेबांशी बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी ठेव बोलु नको असे सांगीतल्याने गणेश यांने कॉल कट केला.
त्यानंतर काही वेळा नंतर पुन्हा हवालदार साहेबांनी भाऊ गणेश याला कॉल करुन "विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुढारी वाचलास काय? सकाळी, पुढारी पेपर वाचं असे सांगुन शांत बस जरा आणि फोन बिन काय लावु नको, तो माणुस आणुन दे तिसरा, माझ मी येतो तुला भेटायला असे सांगीतल्यानंतर भाऊ गणेश यांने कॉल कट केला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला आणि भाऊ गणेश याला कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देऊन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही निघुन गेलो.
त्यानंतर काही वेळाने पुन्हा हवालदार साहेबांनी बेकरीमध्ये येऊन भाऊ गणेश याची भेट घेऊन लाच रक्कमेबाबत विचारल्याने मी, भिलारे साहेबांना संपर्क करुन त्याबाबत सांगीतले, भिलारे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणी आले. भिलारे साहेबांनी सापळा पुर्व कारवाई केली. अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम भाऊ गणेश यांचे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिशामध्ये ठेवली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन पॅन्टचे डावे बाजुच्या खिश्यामध्ये ठेवला. भाऊ गणेश व पंच धुमाळ बेकरीमध्ये थांबुन राहीले, परंतु हवालदार साहेब पैसे घेण्यास बेकरीमध्ये आले नसल्याने भिलारे साहेबांनी कारवाई मागे घेतली व मला व भाऊ गणेश याला गोपनियता राखण्याच्या व पीएसआय हवालदार यांनी लाच रक्कम घेऊन येण्यास सांगीतल्यास कळवणेच्या सुचना देऊन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही निघुन गेलो.
त्यानंतर दि.26.02.2023 रोजी माझी विश्रामबाग चौकात पीएसआय हवालदार साहेबांशी भेट झाली. त्यावेळी हवालदार साहेबांनी मला भावाला मदत केली आहे. आता काय पैसे नकोत असे सांगीतले. मी त्यांना काही अडचण येणार नाही ना असे विचारले असता, त्यांनी अडचण येणार नसल्याचे सांगीतले, मी त्यांना असेच सहकार्य राहुदे अशी हात जोडून विनंती केली. त्यानंतर मी तेथून निघुन गेलो. मी दि.27.02.2023 रोजी भिलारे साहेबांची अँन्टी करप्शन कार्यालय येथे भेट घेऊन त्यांना घडलेली हकीगत सांगुन पीएसआय हवालदार साहेब माझ्याकडून लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नाही. पीएसआय हवालदार साहेबांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करणेबाबत मी भिलारे साहेबांना जबाब दिला.
तरी दि. 17.01.2023, दि. 20.01.2023, दि. 22.01.2023, दि. 24.01.2023, दि.31.01.2023, दि.01.02.2023 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये पीएसआय हवालदार यांनी माझ्याशी व माझा लहान



Scanned with OKEN Scanner

भाऊ चंद्रकांत काद्रोळी यांच्याशी गुन्हां बाबत चर्चा करुन लहान भाऊ चंद्रकांत काद्रोळी याला गुन्हांमध्ये अटक न करता नोटीस देऊन सोडण्यासाठी स्वता:करीता व साहेबांकरीता दि.31.01.2023 रोजी दुपारी 01.25 वा. ते 01.45 वा. दरम्यान चाळीस - पंन्नास हजार रुपये लाचेची मागणी करुन दि.01.02.2023 रोजी 11.10 वा. ते 12.30 वा. दरम्यान माझ्याकडे प्रत्येक आरोपीकरीता 20,000/- रुपये प्रमाणे एकुण 60,000/- रुपये लाचेची मागणीकरुन चर्चेअंती 50,000/- रुपये व त्यानंतर 40,000/- रुपये लाचेची मागणी करुन माझ्याकडून 40,000 /- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन माझी पीएसआय अकबर हवालदार, विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेविरुध्द यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SANJAY SHIVAJIRAO MORE(I (Inspector)) / PBMAH72651 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANJAY SHIVAJIRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH72651

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली.



Scanned with OKEN Scanner